
सोमवार, १३ सप्टेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ५७
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळे महिला असुरक्षित -देकर/२
सिडको करणार खारघर, तळोजामध्ये पाणीपुरवठा/३
खोपोली पालिकेपुढे अतिक्रमण हटविण्याचे आव्हान/४

## रायगडसह राज्यातील पाच जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट



**मुंबई :** बंगालच्या उपसागरात पुन्हा एकदा कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याने महाराष्ट्रात पुढील तीन ते चार दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली आहे. महाराष्ट्र, गुजरात, गोवा आणि कोकण, मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि ओडिशात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. जिल्ह्यांचा विचार करता रायगड, पालघर, ठाणे, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, पुणे येथे ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र येथे पावसाचा जोर कायम राहील. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून राज्यभरात पावसाने आपला जोर कायम ठेवला आहे. गणेशोत्सवादरम्यानही सरींवर सरी कोसळत असून श्रीगणेशाचे स्वागतदेखील वरुणराजाने जोरदार केले. त्यानंतरही पावसाची संततधार कायम आहे. असे असले तरी गणेशभक्तांचा उत्साह कायम असल्याचे दिसून येत आहे.

# ‘मविआ’ सरकार असंवेदनशील

## राज्यातील महिलांच्या सुरक्षेवरून राष्ट्रीय महिला आयोगाचे ताशेरे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकार महिलांच्या बाबतीत असंवेदनशील आहे. यांना महिलांबाबत कोणतीही चिंता नाही. या सरकारने याबाबत उत्तर द्यायला हवे, अशा शब्दांत राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्यांनी सरकारवर ताशेरे ओढले आहेत.



मुंबईत शुक्रवारी पहाटे साकीनाका परिसरात एका ३४ वर्षीय महिलेवर टेम्पोचालकाने अमानुष लैंगिक अत्याचार केले. या महिलेचा शनिवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर राष्ट्रीय महिला आयोगाचे पथक मुंबईत दाखल झाले असून आयोगाच्या सदस्यांनी पीडितेच्या कुटुंबीयांची भेट घेतली. याबाबत त्यांनी सांगितले की, पोलिसांकडून आम्ही संबंधित घटनेची माहिती घेतली आहे. तिच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचा जबाब नोंदवण्यात येणार आहे. त्यानंतर पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून विस्तृत माहिती जाणून घेणार आहोत. मगच यावर चर्चा करता येऊ शकेल.

या घटनेवरून महिला आयोगाच्या सदस्यांनी ‘मविआ’ सरकारवर ताशेरे ओढले. मुंबईत गणपतीच्या आगमनाची तयारी सुरू असताना भररस्त्यात अशी घटना घडते याचा अर्थ इथे आरोपी निरंकुश आहेत. आरोपींना कोणाची भीती नाही आहे. आरोपींच्या मनात भीती असती तर त्या रात्री अशी घटना घडली नसती. गेल्या काही दिवसांपासून अनेक घटनांची माहिती घेतली आहे. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांत आठवडाभरात बलात्काराच्या अनेक घटना घडल्या आहेत. यामागे राज्य सरकारचा निष्काळजीपणा आहे. कायदेव्यवस्था सरकारच्या नियंत्रणात नसल्यामुळेच या घटना घडल्या आहेत, असे महिला आयोगाच्या सदस्यांनी म्हटले आहे.

संपूर्ण देशात प्रत्येक राज्यात महिला आयोग आहे. महाराष्ट्रात मात्र गेल्या दोन वर्षांपासून महिला आयोगाची नेमणूक करण्यात आलेली नाही. अशा वेळी कोणतीही पीडित महिला राज्य आयोगाकडेच मदतीसाठी जाते. इथे अशी कोणतीच संस्था नाही जिथे महिला आपली बाजू मांडू शकतील. महाराष्ट्रात महिला आयोग नसल्याने आम्हाला वेळोवेळी पोलिसांची मदत घ्यावी लागली. राज्य सरकार इतके असंवेदनशील कसे आहे की त्यांनी महिला आयोगाची स्थापना केलेली नाही. जर ते असते तर महिलांना न्याय मिळाला असता, असेही सदस्यांनी नमूद केले.

## हातोड्याचा धाक दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**उल्हासनगर : प्रतिनिधी**

### उल्हासनगरमध्ये दुष्कृत्य

मुंबई, अमरावती, वसई, पिंपरीतील बलात्काराच्या घटना ताज्या असतानाच उल्हासनगर रेल्वेस्थानकानजीक एका १४ वर्षीय मुलीला हातोड्याचा धाक दाखवत आरोपीने दुष्कृत्य केले. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

पीडित अल्पवयीन तरुणी शिर्डीला आईला भेटून शुक्रवारी रात्री ९च्या सुमारास उल्हासनगरला घरी परतत होती. रेल्वेस्थानकातील स्कायवॉकवर तिला मित्र भेटल्याने ती त्यांच्यासोबत बोलत उभी होती. त्याच वेळी श्रीकांत गायकवाड हा माथेफिरू तिथे आला. त्याने हातातील हातोड्याने तिच्या मित्रांना धाक दाखवत पळवून लावले. त्यानंतर या तरुणीलाही हातोड्याचा धाक दाखवत बाजूला नेऊन तिच्यावर अत्याचार केला.

## अमरावतीमध्ये पुन्हा बलात्काराची घटना

**अमरावती :** जिल्ह्यातील रहीमापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वनोजा गावात राहणाऱ्या सात वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर गावातीलच २० वर्षीय तरुणाने बलात्कार केल्याची घटना समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वीच अमरावतीच्या येवदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याने ती गर्भवती राहिली होती. यातूनच तिने दोन दिवसांपूर्वी गळफास घेऊन आत्महत्या केली होती.

■ नवी मुंबईत बार सिंगरवर अत्याचार/२

# उद्धव ठाकरेंना शिवसेनेच्या इज्जतीचा लिलाव करण्याची हौस, त्यासाठी शुभेच्छा!

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेने उत्तर प्रदेशमधील सर्व ४०३ जागांवर निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे. या संदर्भातील एक पत्रक शिवसेनेचे उत्तर प्रदेशचे प्रभारी विश्वजीत सिंह यांनी जारी केले आहे. यावरून भाजप नेते किरीट सोमय्या यांनी शिवसेना पक्षप्रमुख आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे.



### सोमय्यांचा टोला

लोकायुक्तांनी परिवहनमंत्री आणि शिवसेनेचे नेते अनिल परब यांच्या विरोधात कारवाई करण्यासंदर्भात दिलेल्या आदेशाची माहिती देण्यासाठी सोमय्या यांनी मुंबईमध्ये पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्या वेळी ते बोलत होते. परिवहनमंत्री परब यांचे कार्यालय तोडण्याचे आदेश देण्यात आले असून लोकायुक्तांसमोर न्यायालयामध्ये ठाकरे सरकारनेच परब यांच्या कार्यालयाचे बांधकाम अनधिकृत असल्याची माहिती दिल्याचे सोमय्या यांनी या वेळी सांगितले.

याच पत्रकार परिषदेमध्ये सोमय्यांना शिवसेना उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुकीत सर्व जागा लढवणार असल्यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना सोमय्या यांनी या सर्व घोषणा राज्यातील घडामोडींवरून लक्ष्य विचलित करण्यासाठी केल्या जात असल्याचा दावा केला. यापूर्वी बिहारमध्ये निवडणूक लढवताना शिवसेनेच्या उमेदवारांचे डिपॉझिट जप्त होण्याबरोबरच काही उमेदवारांना १०० मतेही पडली नव्हती, असा टोला लगावला, तसेच पुढे हसत त्यांनी उद्धव ठाकरेंना शिवसेनेच्या इज्जतीचा लिलाव करण्याची हौस आहे. त्यासाठी त्यांना शुभेच्छा, असे म्हटले.

## ४०३ की १०० जागा लढविणार?

**मुंबई :** शिवसेना उत्तर प्रदेशमधील सर्व ४०३ जागांवर निवडणूक लढवणार असल्याची घोषणा पक्षाचे तेथील नेते ठाकूर अनिल सिंह यांनी केली आहे. दुसरीकडे शिवसेना खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी मात्र पक्ष १०० जागांवरच लढणार आहे, असे म्हटले आहे. त्यामुळे शिवसेना नक्की किती जागा लढवणार याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, शिवसेना नेहमीच उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी किती जागा लढवणार याचा आकडा फुगवून सांगत असते. प्रत्यक्षात निवडणूक लढवण्याची वेळ येते तेव्हा मात्र १००च्या आतच जागा लढवत असते. त्यामुळे शिवसेना ज्या घोषणा करते त्यात नवीन काही नाही, असे सूत्रांनी सांगितले. २०१७मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेने ५७ जागांवर उमेदवार दिले होते. त्यापैकी ५६ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले होते.

# ठाण्यात इमारतीचा स्लॅब कोसळून दोघांचा मृत्यू



**ठाणे : प्रतिनिधी**

ठाण्यातील राबोडीमध्ये खत्री अपार्टमेंट या धोकादायक इमारतीचा स्लॅब कोसळून दोघांचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. १२) सकाळी घडली. इमारतीचा तिसऱ्या व पहिल्या मजल्यावरील स्लॅब कोसळल्याने तीन रहिवासीदेखील जखमी झाले आहेत. जखमींना कळव्यातील

### तीन जण जखमी

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले असून एकाची प्रकृती चिंताजनक आहे.

ज्या इमारतीमध्ये ही दुर्घटना घडली तिच्या तीन विंग असून तिन्ही इमारती धोकादायक असल्याचे सांगण्यात आले आहे. इमारतीचा स्लॅब कोसळल्याची माहिती मिळाल्यानंतर राज्य आपत्ती व्यवस्थापन व ठाणे आपत्ती व्यवस्थापन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी ७५ जणांना सुखरूप ठिकाणी हलविले. दरम्यान, या ठिकाणी राहणाऱ्या रहिवाशांनी महानगरपालिकेने त्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करावे, अशी मागणी केली आहे.



**मुंबई : केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, आमदार गणपत गायकवाड, आमदार महेश बालदी, आमदार राम सातपुते यांनी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विधानसभेचे विद्यमान विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी विराजमान बाप्पाचे दर्शन घेतले.**

## निवडक

### उद्योजक पाषाणकरांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल

**पुणे :** येथील प्रसिद्ध उद्योजक आणि पाषाणकर ऑटोचे मालक गौतम पाषाणकर यांच्यासह तिघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बिल्डिंग कन्स्ट्रक्शनमध्ये अडीच कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी हा गुन्हा झाला असून त्यांच्यावर मारहाण केल्याचादेखील आरोप फिर्यादी नरेंद्र पाटील यांनी केला आहे.

### भूपेंद्र पटेल होणार गुजरातचे नवे मुख्यमंत्री



**गांधीनगर :** गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर रविवारी (दि. १२) गुजरात भाजपच्या झालेल्या बैठकीत भूपेंद्र रजनीकांत पटेल यांची मुख्यमंत्रिपदी एकमताने निवड करण्यात आली. पटेल हे घाटलोदिया मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले आहेत. त्यांच्या रूपाने पाटीदार समाजाकडे मुख्यमंत्रिपद गेले आहे.

# ...तर राज्यातील मंत्र्यांना रस्त्यावर उतरू देणार नाही!

## ■ ओबीसी आरक्षणावरून भाजप आक्रमक

**मुंबई : प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून निवडणुकांना स्थगिती देता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे, तसेच निवडणूक पुढे ढकलण्याचा अधिकार राज्य सरकारला नाही असे म्हटले आहे. त्यानंतर भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाबाबत भाष्य करताना राज्यातील महाविकास आघाडी सरकारला लक्ष्य केले आहे.



राज्य निवडणूक आयोगाला पाच वर्षांनी संविधानाप्रमाणे निवडणुका घ्याव्या लागतात. राज्य निवडणूक आयोग वेळेवरच निवडणुका घेणार आहे, पण या सरकारने ओबीसी जनतेची दिशाभूल करण्याकरिता निवडणुका पुढे ढकलू अशी विधाने केली आहेत. मुख्यमंत्र्यांनी वांझोट्या बैठका घेतल्या. आता तर ओबीसी समाजाला न्याय मिळेल की नाही हा प्रश्न उभा राहिला आहे. अजूनही तीन महिन्यांमध्ये सुप्रीम कोर्टाच्या निकालाप्रमाणे इंपेरिकल डेटा तयार करून ओबीसींना आरक्षण मिळू शकते, पण या सरकारने ओबीसींना आरक्षण द्यायचे नाही हे पहिल्यापासून ठरवले आहे. ओबीसी समाजाला आरक्षण मिळाले नाही, तर ओबीसी समाज या सरकारच्या मंत्र्यांना रस्त्यावर उतरू देणार नाही. सरकारविरुद्ध भाजप तीव्र आंदोलन करेल, असा इशारा बावनकुळे यांनी दिला आहे.

मराठा आरक्षणापाठोपाठ ओबीसी आरक्षणाचाही राज्यातील महाविकास आघाडी सरकारने घोळ करून ठेवला आहे. त्यामुळे या समाजांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरलेली आहे.

# सोनपावलांनी झाले गौराईचे आगमन



(छाया : जितू शिगवण)

**अलिबाग : प्रतिनिधी**

तीन दिवसांपूर्वी घरोघरी गणेशाचे आगमन झाले होते. त्यानंतर रविवारी (दि. १२) तीन दिवसांची पाहुणी असलेल्या गौराईचे घरोघरी आगमन झाले. गौरी आगमनामुळे महिलावर्गात उत्साहाचे वातावरण आहे.

रविवारी दुपारनंतर मुली आणि महिला गौरी आणण्यासाठी गेल्या. कोकणात तेरड्याच्या गौरी आणल्या जातात. परंपरेनुसार माळरानावरून तेरड्याच्या गौरी घरोघरी वाजतगाजत आणण्यात आल्या. त्यानंतर तिची भेंडीच्या फुलांनी पूजा करण्यात आली. महिलांनी गौराईची सामुदायिक आरती केली. तिला आवडता भाजी-भाकरीचा नैवेद्य दाखवण्यात आला.

रात्री जेवणानंतर गौरीचे स्तवन झाले. महिलांची नाचगाणी, फुगड्या आदी खेळांना रंगत आली. गौरींच्या आगमनामुळे महिलावर्गात उत्साहाचे वातावरण असून गौरीच्या सणासाठी महिला मोठ्या संख्येने माहेरी आल्या आहेत. सोमवारी गौरीपूजन, तसेच तिखटाचा नैवेद्य दाखवला जाईल, तर मंगळवारी सायंकाळी गणपतीसोबत गौरींचे विसर्जन केले जाणार आहे.



# राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळे महिला असुरक्षित -दरेकर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून याला केवळ सरकारचा नाकर्तेपणाच जबाबदार आहे. यांना फक्त आपली खुर्ची सुरक्षित कशी ठेवता येईल याचीच काळजी लागून आहे. राज्यातील कायदा सुव्यवस्था राखण्यात हे सपशेल अपयशी ठरले आहे, अशी टीका विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी महाविकास आघाडी सरकारवर केली आहे.



प्रवीण दरेकर म्हणाले, मुंबईत बलात्कार झालेल्या महिलेचा प्रश्न ऐरणीवर आहे. मुंबईमधील महिला आज भयभीत आहेत. मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर अनेक लोक राहत असून सुरक्षित होते. आज त्या प्रतिमेला तडा गेला आहे. त्यांना सरकारचा नाकर्तेपणा जबाबदार आहे, कारण मागील काही दिवसात मोठ्या प्रमाणावर अशा प्रकारच्या घटना घडल्या आहेत. पुन्हा पुन्हा अशा घटना घडत आहेत. याचा अर्थ सरकारचे लक्ष नाही. पोलिसांवर नियंत्रण नाही. पोलिसांना योग्य मार्गदर्शन नाही.

तुमचा प्राधान्यक्रम बदलला आहे. तुमचा प्राधान्यक्रम वाझेसारख्या प्रवृत्तींना पाठीशी घालणे. म्हणून आज आपला स्कॉटलंडच्या तुलनेत असलेला पोलीस विभाग सरकारच्या नाकर्तेपणामुळे बदनाम होत आहे. पोलीस सक्षम आहेत. हिंमतबाज आहेत परंतु जसा राजा तशी प्रजा, तसेच जसे सरकार तसे पोलीस खाते आणि त्याचा प्रत्यय तर आज अशा भयानक घटनांमधून दिसत आहे, असेही दरेकर यांनी बोलून दाखवले.

याचबरोबर तुमचे केवळ सरकार हेच प्राधान्य आहे का? शेवटी सरकार कशासाठी असते. सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी, सुरक्षित ठेवण्यासाठी. जर तुमच्या राज्यात महिला सुरक्षित नसतील, तर एक दिवसदेखील हे सरकार जनता ठेवणार नाही, असा इशाराही दरेकर यांनी या वेळी दिला.

# नवी मुंबईत बार सिंगरवर अत्याचार

**पनवेल : वार्ताहर**

बारमध्ये सिंगर म्हणून काम करणाऱ्या एका २५ वर्षीय महिलेवर तिच्या ओळखीतील व्यक्तीने जबरदस्तीने लॉजवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. शशिकांत खरात असे या व्यक्तीचे नाव असून एपीएमसी पोलिसांनी त्याच्या विरोधात बलात्कारासह इतर कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे.

### आरोपी फरारी; पोलिसांकडून शोध सुरू

या घटनेतील २५ वर्षीय महिला कोपरखैरणे भागात राहण्यास असून ती पनवेलजवळील कोन परिसर येथील एका ऑर्केस्ट्रा बारमध्ये सिंगर म्हणून काम करते. आरोपी शशिकांत खरात तिच्या ओळखीतीलच असून त्यांच्यातील प्रेमसंबंध तुटल्यानंतरदेखील शशिकांत तिला त्रास देत होता. त्यामुळे पिडितेने पोलिसांकडे तक्रारदेखील दिली. त्या वेळी पोलिसांनी शशिकांतला समज दिली होती, तरीदेखील तो तिला त्रास देत होता. पिडिता काम संपवून घरी जाताना शशिकांतने तिला अडवून जबरदस्तीने एपीएमसीतील प्रिन्स इंटरनॅशनल लॉजवर नेऊन तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले.

या प्रकारानंतर पिडितेने घर गाठले. त्यानंतर तिने एपीएमसी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. हा गुन्हा पुढील तपासासाठी कामोठे पोलिसांकडे वर्ग केला आहे. कामोठे पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

# काँग्रेस आमदाराकडून सुनेचा छळ; तिघांवर गुन्हा

**कऱ्हाड : प्रतिनिधी**

सुनेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी आमदार पी. एन. पाटील यांच्यासह त्यांच्या मुलगा व मुलीच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अदिती राजेश पाटील यांनी कराड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अदिती ही सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांची पुतणी आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, दोन वर्षांपूर्वी पी. एन. पाटील यांचा मुलगा राजेश व अदिती यांचा कोल्हापुरात विवाह झाला. लग्नानंतर आपला सासरी छळ करतानाच एक कोटीची मागणी केल्याचे

### कराड पोलिसांत तक्रार

अदिती यांनी फिर्यादीत म्हटले आहे. सासरे पांडुरंग निवृत्ती पाटील ऊर्फ पी. एन. पाटील, पती राजेश पांडुरंग पाटील व नणंद टीना महेश पाटील अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत.

पी. एन. पाटील हे काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष आहेत. बाळासाहेब पाटील सहकारमंत्री, तर अदितीचे वडील सुभाष पाटील हेही राजकारणात ज्येष्ठ नेते आहेत. गेली दोन-तीन महिने या कुटुंबात वाद सुरू होता. तो मिटविण्यासाठी राजकीय पातळीवर समझोता करण्याचे प्रयत्न झाले, पण त्यात यश आले नाही. दरम्यान, काँग्रेसच्या विद्यमान आमदारांवर गुन्हा दाखल झाल्याने राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.



# साळाव येथे महिलेचा विनयभंग

**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळावनजीक जेएसडब्लू कंपनीच्या वसाहतीत महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुरूड तालुक्यात मिठेखार ग्रामपंचायत हद्दीत येत असलेल्या साळाव जेएसडब्लू कंपनीच्या वसाहतीत ८ ऑगस्ट २०१८ ते २२ ऑगस्ट २०२१ दरम्यान वेळोवेळी महिला फिर्यादीचा पाठलाग करून एकांतात गाठून अश्लील बोलून, तसेच ती घरी जात असताना आरोपीने फिर्यादीस बिल्डिंगच्या जिन्यात गाठून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तसेच याबद्दल पतीला सांगितलेस तर त्याची नोकरी घालवीन व त्याला बघून घेईन, अशी धमकी दिली, अशी तक्रार फिर्यादीने रेवदंडा पोलीस ठाण्यात नोंदविली आहे.

या प्रकरणी भा.दं.वि. कलम ३५४, ३५४(अ)(१), आयव्ही, ३५४(ड),(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# दारूच्या बाटल्या चोरणारा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील वाईन शॉप फोडून दारूच्या बाटल्या आणि रोख रक्कम चोरणाऱ्या गुन्हेगाराला नवी मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे, हा चोर वाईन शॉपमधून फक्त विदेशी दारूच्या बाटल्याच चोरी करीत होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवी मुंबईतील एनआरआय पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेले एक वाईन शॉप ११ ऑगस्टला लुटल्याची घटना घडली होती. या गुन्ह्याच्या तपासात सीसीटीव्ही फुटेज, आरोपीची गुन्हा करण्याची पद्धत, तसेच नवी मुंबई आयुक्तालयामध्ये अशाच प्रकारचे यापूर्वी दाखल झालेले गुन्हे याचा तांत्रिक तपास करण्यात आला. या सर्व गुन्ह्यातील मोडस ऑपरेंडी सारखीच होती. यावरून नवी मुंबईतील सर्व गुन्हे एकाच आरोपीने केल्याचे एनआरआय पोलिसांच्या लक्षात आले. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने कल्याण येथील खडेवडवली गावात राहणाऱ्या रामनिवास मंजू गुप्ता याला ताब्यात घेतले. रामनिवास याची कसून चौकशी केली असता रामनिवास याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून एकूण सव्वातीन लाख रुपयांची विदेशी दारू जप्त करण्यात आली. आरोपीवर मुंबई, ठाणे व नवी मुंबई परिसरात एकूण २१ गुन्हे दाखल असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांनी दिली.

# बालसुधारगृहातील मुलाला पळविले

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत दहिवली येथे असलेल्या बालसुधारगृहातील १६ वर्षांच्या मुलाला पळवून नेल्याची घटना घडली आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत शुक्रवारी (दि. १०) पिडित मुलगा (वय १६) कर्जत तालुक्यातील दहीवली येथील सुधारगृहात राहत होता. तो पीडित मुलगा मूळचा रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील लक्ष्मी वसाहत येथील राहणारा आहे. दहिवली बालसुधारगृहातून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कोणत्यातरी अज्ञात कारणास्तव फिर्यादी (रा. मार्केवाडी, पो. कडाव कर्जत) यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने फूस लावून मुलाला पळवून नेले आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे भा.दं.वि. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक निरीक्षक राजू आल्हाट करीत आहेत.





**पनवेल : नगरसेविका दर्शना भोईर यांच्या प्रयत्नाने विसावा हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंतच्या रस्त्यावरील धोकादायक झालेल्या ड्रेनेजची झाकणे बदलण्यात आली. या वेळी भाजप झोपडपट्टी सेलचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत मंजुळे, कार्यकर्ते रमाकांत वेदक उपस्थित होते.**

### दुखवटा

## विजय सुर्वे



**पेण :** शहरातील आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि अखिल भारतीय बौद्ध महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष विजय सुर्वे (वय ६५) यांचे नुकतेचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. विजय सुर्वे यांचा जलदानविधी मंगळवारी (दि. १४) कासारआळी येथील महाकाली हॉल येथे होणार आहे.


# गणेश दर्शन




**मुंबई : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी कॅबिनेट मंत्री नारायण राणे यांच्या जुहू येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या, रिपाइंचे मुंबई अध्यक्ष गौतम सोनवणे, हेमंत रणपिसे, प्रवीण मोरे आदी उपस्थित होते.**




**मुंबई : भाजप प्रदेश कार्यालयीन चिटणीस मुकुंद कुलकर्णी यांच्या वरळी येथील निवासस्थानी विराजमान असलेला बाप्पा.**



**अशोक ठाकूर, भेंडखळ, उरण**




**प्रतिक गोंधळी, चिरनेर, उरण**



**पत्रकार जीवन केणी, चिरनेर, उरण**









**भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी ठिकठिकाणी जाऊन बाप्पाचे दर्शन घेतले.**





## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**सोमवार, दि. १३ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे**

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

## कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. उपकेंद्र लॉ कॉलेज, तळोजा
- १२. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १३. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १५. श्री. गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
- १६. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १७. आगरी शाळा, खांदा कॉलनी
- १८. सुधागड कॉलेज, कळंबोली
- १९. न्यु इंग्लिश स्कूल, कळंबोली
- २०. दत्तुशेठ पाटील हायस्कूल, कामोठे

## कोवॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

**टीप : प्रत्यक्ष लसीकरणासाठी कुपन्स मर्यादित असल्यामुळे ऑनलाइन नोंदणीस प्राधान्य द्यावे.**

**पनवेल महानगरपालिकेने परदेशात शिक्षणाकरिता, नोकरीकरिता तसेच ऑलिम्पिक खेळाकरिता जाणाऱ्या नागरिकांसाठी कोविड लसीकरण कोविशिल्डचा दुसरा डोस देण्याकरिता विशेष सत्राचे आयोजन केले आहे. या सत्रामध्ये पहिला डोस घेऊन २८ दिवस पूर्ण झालेल्या परदेशी जाणाऱ्या नागरिकांचे लसीकरण केले जाईल.**

**कागदपत्रे :- आधार कार्ड, पासपोर्ट, व्हिसा डॉक्युमेंट, परदेशात काम करीत असल्याचे प्रमाणपत्र तसेच खेळाकरिता किंवा शिक्षणाकरिता संबंधित संस्थेचे ऑफर लेटर**

## पनवेल ग्रामीण लसीकरण

- १. पडघे, रा.जि.प. शाळा
- २. खिडुकपाडा, रा.जि.प. शाळा
- ३. खारघर गाव, रा.जि.प. शाळा
- ४. कोपरा, समाजमंदिर
- ५. काळुंद्रे, रा.जि.प. शाळा
- ६. घोट रा.जि.प. शाळा/म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघ्राची वाडी, रा.जि.प. शाळा
- ७. धामोळे पाडा , रा.जि.प. शाळा
- ८. खुटारी/एकटपाडा, रा.जि.प. शाळा
- ९. किरवली/आडीवली, रा.जि.प. शाळा
- १०. धरणा, रा.जि.प. शाळा

**निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता २०० व दुसऱ्या डोसकरिता १०० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**
**(वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)**

# सिडको करणार खारघर, तळोजामध्ये पाणीपुरवठा

## भाजपच्या पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

खारघर आणि तळोजा परिसरातील नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्यामुळे सिडकोने पाणीपुरवठा करण्यासाठी एक कोटी ४१ लाख रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. यासंदर्भात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप पदाधिकारी आणि नगरसेवकांनी सिडकोला धारेवर धरले होते. पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करून सिडकोसोबत बैठक घेतली होती.

खारघर आणि तळोजा परिसरात गेल्या काही वर्षांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे नागरिकांनी सिडकोकडे लेखी तक्रार केली होती. आमदार प्रशांत ठाकूर आणि सभागृह नेते परेश ठाकूर, तसेच भाजप नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना भेटून पाणी समस्या गंभीर होत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. तर काही रहिवाशांनी पाणी प्रश्नावर आंदोलने केली होती. पाणीपुरवठा समस्यांबाबत तसेच भविष्यकालीन पाणीपुरवठ्याचे नियोजन



करण्यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केल्याप्रमाणे सिडकोने दखल घेऊन सहव्यवस्थापकीय संचालक कैलाश शिंदे यांनी खारघरमधील ज्या भागातील सोसायटीत कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. अशा सोसायटीत टँकरने पाणीपुरवठा केला जाईल, असे आश्वासन दिले होते.

दिलेल्या आश्वासनानुसार खारघर आणि तळोजा येथील आकस्मिक निकड लक्षात घेत पिण्याचा भाड्याने पुरवठा करणाऱ्या वॉटर टँकरसाठी निविदा प्रसिद्ध केली आहे. खारघर आणि तळोजासाठी ३६५ दिवस पाणीपुरवठा केला जाणार असून यासाठी सिडको एक कोटी ४१ लाख ६२ हजार रुपये खर्च करणार आहे.

# विसर्जन घाटाच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण

## गणेशभक्तांनी मानले तेजस कांडपिळेंचे आभार

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या प्रभाग २०मधील पोदीवरील गणेश विसर्जन घाटावर शनिवारी (दि. ११) दीड दिवसाच्या गणेशमूर्तींचे मोठ्या प्रमाणात विसर्जन करण्यात आले. या वेळी तेथील तुटलेल्या घाटाचे आणि खराब झालेल्या रस्त्याचे काम पूर्ण करून घेतल्याबद्दल गणेशभक्तांनी नगरसेवक तेजस कांडपिळे यांचे भेटून आभार मानले.





पनवेल महापालिकेच्या प्रभाग २० मधील पोदीवरील गणेश विसर्जन घाटाची आणि रस्त्याची पावसामुळे दैनावस्था झाली होती. रस्त्यावर चिखल झाला होता. त्यामुळे तेथून गणेशमूर्ती घेऊन जाणे अवघड होते. नागरिकांच्यात त्याबाबत असंतोष निर्माण होत असल्याने प्रभाग २०चे नगरसेवक तेजस कांडपिळे यांनी आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याजवळ चर्चा करून याबाबत महापालिका आयुक्तांना २० ऑगस्ट रोजी पत्र देऊन रस्त्याचे काँक्रीटीकरण किंवा पेव्हर बॉक्स बसवण्याची मागणी सोबत तेथील रस्त्याची दुर्दशा दाखवणारा फोटो देऊन केली होती.

महापालिका आयुक्तांनी त्याची दखल घेऊन तातडीने पोदी विसर्जन घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यावर काँक्रीटीकरण केले. त्यामुळे पोदी गावातील नागरिकांना त्या ठिकाणी गणेश विसर्जनासाठी सुखरूप जाता आले. त्यामुळे शनिवारी संध्याकाळी तेथे येणारा गणेशभक्त नगरसेवक तेजस कांडपिळे यांचे भेटून आभार मानत होता.





**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर प्रमुख मार्गदर्शक असलेल्या श्री युवा प्रतिष्ठानमार्फत गणेश घाटावर गणरायाच्या विसर्जनाची आदर्शवत तयारी करून तक्का गाव, तक्का कॉलनी व पनवेल परिसरातील दीड दिवसाच्या गणरायांना विधिवत निरोप देण्यात आला. या वेळी गणेश घाटावर नगरसेवक अजय बहिरा व श्री युवा प्रतिष्ठानचे संस्थापक प्रतिक देवचंद बहिरा उपस्थित होते.**

# आळी आंबिवलीत एकाचा वीज पोलवरून पडून मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा आळी आंबिवली येथील भालचंद्र हरिभाऊ जाधव (वय ४१) हा मोहोपाडा मुख्य बाजारपेठेत बंद अवस्थेतील पथदिवा बदलून त्याजागी नवीन पथदिवा लावण्यास पोलवर चढला होता. या वेळी त्यांना अचानक विजेचा धक्का लागला व ते खाली पडले. त्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

भालचंद्र जाधव मोहोपाडा वीजवितरणमध्ये कंत्राटी कामगार म्हणून सेवेत होते. गणेशोत्सवात कुठेही पथदिवा बंद राहू नये यासाठी वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायत हद्दीत गेल्या काही दिवस ठिकठिकाणी पथदिवे बदलण्याचे काम सुरू आहे. यातच मोहोपाडा बाजारपेठेतील गणेश गीध यांच्या दुकानासमोरील पथदिवा बंद अवस्थेत असल्याने त्याजागी नवीन पथदिवा लावावा अशी मागणी नागरिकांनी केली होती. हा पथदिवा बदलण्यासाठी भालचंद्र जाधव हे पोलवर चढले. या वेळी काम सुरू असतानाच विजेचा झटका लागल्याने भालचंद्र जमिनीवर खाली कोसळले. त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने भालचंद्रला ताबडतोब एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, परंतु तपासणीत डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# भाजप नेते बबन बारगजे यांना कोविड योद्धा पुरस्कार

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

श्री संत भगवान बाबा सेवा समिती नेरूळ यांच्या वतीने कोरोनाच्या काळात जे कामगार कामावर होते, अशा कामगारांचा व लोकप्रतिनिधींचा सत्कार मंडळाचे अध्यक्ष अमोल कुटे यांनी केला. यामध्ये भटके-विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांचा कोविड योद्धा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



नवी मुंबई व पनवेलमधील पोलीस खात्यात, आरोग्य खात्यात व बेस्टमध्ये काम करणाऱ्या कामगारांचा सत्कार करण्यात आला. त्यांना त्यांच्या घरी जाऊन अमोल कुटे, पिंपळनेरचे सरपंच बाळासाहेब बडे, अमोल पालवे आदींनी सन्मानपत्र प्रदान केले.

बबन बारगजे यांनी कोरोना काळात बऱ्याच लोकांना मदत केली. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने घरोघरी अन्नधान्याचे किट वाटप केले. त्या अनुषंगाने त्यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# गणेश दर्शन



पनवेल : काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी विराजमान बाप्पा.






कळंबोली : भाजप महिला मोर्चा शहर सरचिटणीस दुर्गावती हरिराम सहानी यांच्या निवासस्थानी विराजमान बाप्पाचे भाजप शहर मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, प्रभाग ७च्या नगरसेविका प्रमिला रविनाथ पाटील, उत्तर भारतीय सेलचे शहर अध्यक्ष केशव यादव, मच्छींद्र कुरूंद आदींनी दर्शन घेतले. या वेळी सर्वांचे स्वागत करण्यात आले.



वृत्तपत्र विक्रेते अविनाश पडवळ यांची मुलगी रसिका ईश्वरकर यांच्या घरी विराजमान गणराय.



बंडू पोरजी, धानसर, पनवेल



रोहिंजणचा राजा, रोहिंजण, पनवेल



रामकृष्ण कोठावळे, जांभूळपाडा, उरण



जयेश वत्सराज, देऊळवाडी, उरण



रवींद्र पाटील, कोंडले, पनवेल











सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पाटील, कोटगाव, उरण







पनवेल : भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी शिवकर येथे युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, ग्रामपंचायत सदस्य किर्ती ढवळे, तसेच घरत, पाटील व अन्य ठिकाणच्या बाप्पांचे दर्शन घेतले.



भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, उरण

## संपादकीय

# महिलांची सुरक्षा ऐरणीवर

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत एका महिलेवरील अमानुष अत्याचार आणि वेदनादायी मृत्यूने अवघा देश सुन्न झाला आहे. यानिमित्ताने महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्य सरकारमधील मंत्री 'वसुली' करण्यात गुंतले असल्याने नराधम सोकावले असून ते बिनधास्तपणे दुष्कृत्ये करीत असल्याचे संतापजनक चित्र पाहावयास मिळत आहे.

**राज्यात सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. सर्व जण गणरायाची आराधना करण्यात मग्न असताना शुक्रवारी पहाटे मुंबईतील साकीनाका येथे एका टेम्पोचालकाने रस्त्यावर वास्तव्यास असलेल्या महिलेवर बलात्कार केला आणि नंतर तिच्या गुप्तांगात रॉड घुसवला. या घटनेतील पीडितेचा दुसऱ्या दिवशी राजावाडी हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. आरोपी मोहन चौहानला पोलिसांनी अटक केली आहे. त्याला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे. या घटनेमुळे देशभर अस्वस्थता निर्माण केलेल्या २०१२मधील निर्भया सामूहिक बलात्काराच्या घटनेतील क्रौर्याची आठवण जागी झाली. त्याच वेळी राज्यात महिला, मुलींवर होणारे अत्याचार कधी थांबणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार यात सपशेल अपयशी ठरले आहे. आरोपींना कशाचाही धाक उरलेला नाही. ते बिनदिक्कतपणे आपला कार्यभाग साधत आहेत. राज्याची सुरक्षा ज्या गृहमंत्र्यांच्या हातात असते ते माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख गायब आहेत. १०० कोटी वसुलीप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने अर्थात ईडीने त्यांना लूकआऊट नोटीस बजावलेली आहे. देशमुख अडचणीत आल्यानंतर त्यांच्या जागी दिलीप वळसे-पाटील यांची गृहमंत्रिपदी वर्णी लागली, मात्र कायदा-व्यवस्थेचा उडालेला बोजवारा कायम आहे. एकीकडे सण-उत्सवात सर्वसामान्यांना बंधने लादलेली असताना गुन्हेगार मात्र रान मोकळे असल्यासारखे काहीही करीत आहेत. त्यांना खाकी वर्दीचा धाकच उरलेला नाही हे मुंबईतील संतापजनक घटनेतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. राज्याचे उत्तरदायित्व असलेले सरकार सुस्त असल्याने असे प्रकार वारंवार होत आहेत. एखादा दुर्दैवी प्रकार घडला की घोषणा करायच्या आणि नंतर नवी घटना घडेपर्यंत त्याकडे दुर्लक्ष करायचे ही या सरकारची कार्यपद्धती आहे. त्यामुळेच नराधम निर्ढावले आहेत. कुठे महिलेची बोटे छाटली जात आहेत, कुठे पीडितेची तक्रार पोलिसांकडून घेतली जात नाहीत, तर बलात्काराच्या घटनांची मालिकाच सुरू आहे. अशा परिस्थितीत हैवानांवर वचक निर्माण करण्याची आवश्यकता असताना ठाकरे सरकार मात्र कोरोनाचे कारण पुढे करून हातावर हात देऊन बसले आहे. हेच सरकार सर्वसामान्य जनतेचे जगणे मात्र असह्य करीत आहे. महिलांना तर घराबाहेर पडणे अवघड झाले आहे. ही मोगलाईच म्हटली आहे. या सरकारने शक्ती कायदा लागू करून महिलांना संरक्षण देण्याची घोषणा केली होती. मग कुठे गेला तो कायदा. आणखी किती महिला, मुली अत्याचाऱ्याच्या बळी पडल्यानंतर हा कायदा राज्यात लागू केला जाणार आहे, असा प्रश्न या निमित्ताने राज्यकर्त्यांना विचारावासा वाटतो. फक्त घोषणा, आश्वासने देण्याऐवजी ठोस कृती करण्याची वेळ आता आली आहे, पण षंढ सरकार ते करेल का? हीच शंका आहे. गणरायाने त्यासाठी त्यांना सुबुद्धी द्यावी, हीच त्याच्या चरणी प्रार्थना!**

# लसीकरण महोत्सव

कर्जत शहरात कोरोनाचे रुग्ण यांची संख्या गेल्या १५ महिन्यात शून्यावर येऊ शकली नाही. त्यामुळे आता पालिका आणि उपजिल्हा रुग्णालय यांनी प्रत्येक प्रभागात कोरोनाला दूर ठेवण्यासाठी आवश्यक असलेले लसीकरण करण्यावर भर दिला आहे. कर्जत शहर लसीकरण संघर्ष समिती यांच्या पुढाकाराने कर्जत शहरात या वर्षीचा गणेशोत्सव लसीकरण उत्सव झाला आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने कर्जत शहर लसीकरण पूर्ण करून कोरोना मुक्तीकडे वाटचाल करत आहे असेच यानिमित्ताने म्हणावे लागेल, पण यासाठी राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी लसीकरण संघर्ष समितीच्या आवाहनाला हातात हात घालून कर्जत शहरातील सर्व नागरिकांचे लसीकरण व्हावे यासाठी करीत असलेले प्रयत्न स्तुत्य असेच आहेत.

कर्जत नगरपालिकेच्या हद्दीतील नागरिकांची कोविड लसीकरणासाठी येथील कर्जत उपजिल्हा रुग्णालयात गैरसोय होत आहे. त्यामुळे कर्जत शहरातील नागरिकांचे शिष्टमंडळ कर्जत नगरपालिका कार्यालयात जाऊन शहरातील प्रत्येक प्रभागात लसीकरण व्हावे, अशी मागणी करणारे निवेदन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि पालिका मुख्याधिकारी यांना दिले. अ‍ॅडव्होकेट कैलास मोरे, राजाभाऊ कोठारी, कृष्णा जाधव, जयवंत म्हसे, विनोद पांडे, अजय वर्धावे, प्रशांत उगले, मन्सूर बोहरी, मनोज निकम या नागरिकांनी या वेळी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात कर्जत शहरातील नागरिकांना अन्य भागातून आलेल्या लोकांकडून चुकीची वागणूक मिळत आहे. अशा तक्रारी नागरिकांकडून कर्जतच्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल आणि पालिका मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्याकडे करण्यात आल्या. नागरिकांच्या समस्या आणि मागणी याबाबत नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांनी सकारात्मकता दाखवली आणि सहकार्य करून निश्चित मार्ग काढू, असे सांगितले. त्या वेळी मुख्याधिकारी यांनी त्यात काही तांत्रिक मुद्दे आहेत, तसेच लस उपलब्ध होणे हेही महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन पालिका नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी प्रयत्न करेल, असे आश्वासन दिले. डॉक्टर्स, नर्स हे कर्जत उपजिल्हा रुग्णालयात कमी आहेत. त्यामुळे कर्जत शहरातील डॉक्टर्स लसीकरणासाठी सहकार्य केले, तर वार्डप्रमाणे लसीकरण घेता येईल, अशी चर्चा झाली. कर्जत शहरातील नागरिकांसाठी ही मोहीम पालिकेने उपजिल्हा रुग्णालय यांच्या माध्यमातून राबवावी यासाठी कार्यवाही सुरू करण्याचे आश्वासन मुख्याधिकारी यांनी दिले. शहरातील नागरिकांनी पुढाकार घेतल्यास कर्जत तालुका प्रशासनाला देखील शहरातील प्रत्येक प्रभागात लसीकरण होण्याची कार्यवाही करणे शक्य होऊ शकते. त्याच वेळी आपल्या पालिकेकडून तसा प्रयत्न झाला आहे याची आठवणही करून दिली, मात्र पालिकेच्या हातात लसीकरण केंद्र सुरू करणे शक्य नसल्याने पालिकेने याबाबत उपजिल्हा रुग्णालय यांना लसीकरण संघर्ष समितीचे आवाहन आणि विनंती करणारे पत्र दिले.

त्यावेळी प्रत्येक प्रभागात लसीकरण व्हावे यासाठी उपजिल्हा रुग्णालयाला लसीकरणाचे कर्जत तालुक्याचे नोडल ऑफिसर असलेले तहसीलदार यांची परवानगी आवश्यक असल्याची माहिती लसीकरण संघर्ष समितीला मिळाली आणि मग लसीकरण संघर्ष समितीने पुन्हा एकदा कर्जत तहसील कार्यालय गाठले. तेथे कर्जत शहरात पालिका लसीकरण केंद्र उघडून शहरातील सर्व नागरिकांचे लसीकरण करून घेण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. त्या वेळी तहसीलदार विक्रम देशमुख यांनी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनोज बनसोडे आणि कर्जत नगर परिषद मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्याशी बोलून योग्य निर्णय घेऊन असे सकारात्मक आश्वासन लसीकरण संघर्ष समितीच्या अ‍ॅड. कैलाश मोरे, कृष्णा जाधव, जयवंत म्हसे, प्रशांत उगले, राजाभाऊ कोठारी, मुकेश पाटील यांच्या शिष्टमंडळाला दिले, परंतु कर्जत उपजिल्हा रुग्णालयामधील कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या आरोग्यसेविका यांच्या सेवा शासनाने खंडित केल्याने शहरातील प्रत्येक प्रभागात आणि उपजिल्हा रुग्णालयात लसीकरण करण्यावर परिणाम झाला आहे याची कल्पना तहसीलदार यांना वैद्यकीय अधीक्षक यांच्याकडून देण्यात आली. त्या वेळी नागरिकांची मागणी आणि लसीकरणाची गरज लक्षात घेऊन उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. मनोज बनसोडे यांनी आपल्या सर्व आरोग्यसेविका आणि आरोग्य कर्मचारी यांना विश्वासात घेऊन ऐन गणेशोत्सव काळात लसीकरण महोत्सव साजरा करण्यासाठी तयारी दाखवली. त्यानंतर तहसीलदार विक्रम देशमुख, नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, पालिका मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. बनसोडे यांनी कर्जत शहरातील प्रत्येक प्रभागात लसीकरण करून घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला.



स्थानिक नगरसेवक आणि उपजिल्हा रुग्णालय यांच्या माध्यमातून लसीकरण महोत्सव कर्जत शहरात आयोजित करण्यावर एकमत झाले. कर्जत शहरात ९ प्रभाग असून सोयीनुसार लसीकरण केंद्र आयोजित करण्यासाठी मुख्याधिकारी यांनी सर्व लोकप्रतिनिधी यांच्याबरोबर चर्चा केली आणि कर्जत शहरात सर्व गणेश भक्त गणेशोत्सव साजरा करण्यात दंग असताना प्रत्येक प्रभागात लसीकरण मोहीम राबविण्याची तयारी पूर्ण झाली आणि कर्जत शहरात गणेशोत्सव सुरू झाल्यावर दुसऱ्या दिवसापासून लसीकरण मोहीम प्रत्येक प्रभागात राबविली जाऊ लागली. कर्जत शहरात नऊ प्रभाग असले, तरी १८ नगरसेवक आणि दोन स्वीकृत नगरसेवक पालिकेत प्रतिनिधित्व करीत असल्याने केवळ नऊ प्रभागांत नाही तर जे लोकप्रतिनिधी लसीकरण करून घेण्यासाठी शिबिर आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतील त्या सर्वांनी शिबिर आयोजित करून कर्जत शहर कोरोना मुक्तीकडे नेण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन लसीकरण संघर्ष समितीने केले आहे. त्यामुळे कर्जत शहरात ११ सप्टेंबरपासून लसीकरण शिबिर आयोजित होऊ लागली आहेत. ११ सप्टेंबर रोजी गुंडगे, म्हाडा कॉलनी आणि नाना मास्तर नगरमध्ये स्थानिक नगरसेवक यांनी लसीकरण शिबिर आयोजित केले. नगरसेविका वैशाली मोरे, स्वामिनी मांजरे, संचिता पाटील यांनी लसीकरण शिबिर आयोजित करून आपल्या प्रभागातील जनतेला कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सिन लसीकरणाचे डोस उपलब्ध करून दिले. १२ सप्टेंबर रोजी कर्जत शहरातील प्रभाग ७ मध्ये हनुमान मंदिर येथे नगरसेविका मधुरा चंदन, नगरसेवक राहुल डाळिंबकर यांनी बौद्ध समाज मंदिर, तर स्वीकृत नगरसेवक संकेत भासे यांनी दहिवली संजयनगर येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात लसीकरण शिबिर सुरू आहे. कर्जत शहरात लसीकरण महोत्सवात पुढील सात दिवसांत संपूर्ण शहरात लसीकरण शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. लसीकरण शिबिरांच्या माध्यमातून कर्जत शहरात लसीकरण महोत्सव साजरा होत असून कोरोनाला कर्जत शहरातून दूर ढकलण्यासाठी हा महोत्सव महत्त्वाचा ठरणार आहे.

कर्जत नगर परिषदेने एप्रिल महिन्यात शहरातील तीन भागांत लसीकरण केंद्र सुरू करण्याची तयारी दर्शवली होती. त्यासाठी जागादेखील उपलब्ध झाली होती, मात्र अभिनव प्रशाळेतील एका दिवसाच्या लसीकरण केंद्रानंतर उपजिल्हा रुग्णालयाकडून असहकाराची भूमिका घेण्यात आली. त्यामुळे शहरात लसीकरण मंदावले होते, मात्र दररोज होणारी गर्दी आणि त्यात कर्जत शहराबाहेर तालुक्यात अनेक ठिकाणी लसीकरण सुरू असताना देखील शहराबाहेरील लोकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन कर्जतमधील नागरिक लसीकरण करून घेण्यासाठी धावपळ करताना दिसत होते. त्यात कर्जत तालुक्याबाहेरील लोकांची लसीकरण करून घेण्यासाठी पहाटेपासून होणारी गर्दी पाहून कर्जत तालुक्यात संताप व्यक्त केला जाऊ लागला होता. आपल्या शहरातील आणि आजूबाजूच्या गावातील लोकांची लसीकरण करून घेण्यासाठी होणारी धावपळ पाहून लसीकरण संघर्ष समितीची निर्मिती झाली. या समितीने अत्यंत योग्य पद्धतीने कर्जत शहरातील प्रत्येक विभागात लसीकरण करून घेण्यासाठी केलेली नियोजनबद्ध वाटचाल आणि त्यासाठी केलेला सततचा पाठपुरावा यामुळे कर्जत शहरात लसीकरण महोत्सव आयोजित झाला आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने कर्जत कोरोनामुक्तीकडे पुढचे पाऊल टाकत आहे.

**खबरबात**
**संतोष पेरणे**

# नियोजित पार्कवरील अतिक्रमण हटविण्याचे खोपोली पालिकेपुढे आव्हान

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद हद्दीत शिळफाटा येथे पाताळगंगा नदीकाठी नानानानी पार्कचा प्रस्ताव वाढत्या अतिक्रमणामुळे रखडणार असून, नव्याने पदभार घेतलेले मुख्याधिकारी अतिक्रमण विषय किती गांभीर्याने घेणार याकडे खोपोली नागरिकांचे लक्ष लागले आहे. दोन वर्षापूर्वी खोपोली शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते इंदिरा चौक रस्त्याचे रुंदीकरण हाती घेण्यात आले होते. रस्ता रुंद होणार याकरिता दुकानदारानींही सहकार्याची भूमिका घेत चार ते पाच फूट जागा सोडली. दुकानाच्या विरुद्ध बाजूला रस्त्यालगत असलेल्या टपऱ्यादेखील या वेळी हटवण्यात आल्या होत्या.



(छाया : जयवंत माडपे)

तत्कालीन खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी दुकानदारांच्या सहकार्याचे आभार मानत मोकळ्या झालेल्या टपऱ्यांच्या जागी नानानानी पार्क तयार करण्यात येईल, असे सांगितले होते, परंतु त्यानंतर शिंदे यांची बदली झाली आणि त्यांच्या जागी गणेश शेटे आले, पण त्यानंतर कामाचा वेगदेखील कोरोनामुळे मंदावला. त्यामुळे नानानानी पार्क उभे राहत नसल्याने मोकळ्या जागेवर पुन्हा टपऱ्या, चिकन दुकाने थाटली असून परिसर विद्रूप झाला आहे. स्थानिकांनी नगर परिषदेत तक्रार देऊनही अतिक्रमण विरोधात कारवाई झालेली नाही. मुख्याधिकारी गणेश शेटे यांचीही बदली झाली असून नवीन मुख्याधिकारी यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला आहे. त्यामुळे अतिक्रमण विषय ते कसा हाताळणार याकडे स्थानिक नागरिक लक्ष ठेवून आहेत.

# 'फिनो'च्या माध्यमातून डिजिटल बँकिंग सेवा

**पेण : प्रतिनिधी**

फिनो बँकेच्या शाखेमधून ग्राहकांना डिजिटल सेवा देण्याचा बँकेचा हेतू असून आज गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर पेणमध्ये फिनो बँकेच्या आउटलेटची सुरुवात विभुते इन्टरप्रायजेसच्या माध्यमातून करण्यात येत असल्याची माहिती बँकेचे कोकण मुख्य प्रबंधक गौतम जाधव यांनी दिली.



पेणमधील फिनो बँकेच्या डिजिटल सेवा देणाऱ्या शाखेची सुरुवात चिंचपाडा येथे करण्यात आली असून या वेळी बँकेतर्फे देण्यात येणाऱ्या सेवेची माहिती पत्रकार परिषदेत गौतम जाधव यांनी दिली. या वेळी प्रबंधक मिलिंद खैरनार, मंगेश घोडके, प्रभारी प्रमुख मयूर झेमसे, प्रबंधक दत्ता मराठे, जनसंपर्क अधिकारी ऊर्मिला देठे, विभुती इंटरप्रायझेसचे प्रियांका पाटील, हर्षद म्हात्रे, आशिष भगत आदी कर्मचारी उपस्थित होते.

कोरोना काळात डिजिटल बँकिंग सेवेला महत्त्व आले असून ग्राहकांना घरपोच सेवा देण्याचे कामही या वेळी करण्यात आले आहे. खाते उघडणे, आधार पेमेंट, पैसे जमा करणे, पैसे काढणे, दुसऱ्या खात्यात रक्कम पाठिवणे, डेबिट कार्ड सुविधा अशा अनेक प्रकरच्या सुविधा या माध्यमातून होणार असून विशेष करून फेरीवाले, कामगार वर्ग यांना या सेवेचा उपयोग होत असल्याचे जाधव यांनी सांगितले. या वेळी ही सेवा कशा प्रकारे ग्राहकांना देण्यात येईल याचे प्रात्यक्षिक मिलिंद खैरनार यांनी करून दाखविले. ग्राहकांनीही जास्तीत जास्त या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

# रायगडच्या पर्यटन विकासासाठी छायाचित्र स्पर्धा

**रोहे : प्रतिनिधी**

२७ सप्टेंबर या जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यातील अस्सल कोकण परिचित होण्यासाठी एक विशेष छायाचित्र स्पर्धा आयोजित केली आहे. दक्षिण रायगड जिल्ह्यातील परिचित, अपरिचित आणि अप्रकाशित पर्यटनस्थळांचा शोध व्हावा आणि जास्तीत जास्त पर्यटकांपर्यंत ती स्थळे पोहोचवावी या उद्देशाने रायगड जिल्हा कृषी प्रबोधिनी व लक्ष्मीसृष्टी अ‍ॅग्रो पर्यटन सहकारी सेवा या संस्थेतर्फे निसर्ग छायाचित्र स्पर्धा आयोजित केली आहे.



या स्पर्धेत निसर्ग पर्यटन, धार्मिक पर्यटन, वर्षा पर्यटन, कासपठार, निसर्गरम्य दृश्य, नद्या, तलाव, प्राणीजीवन, गिर्यारोहण, ट्रेकिंग त्याचबरोबर ऐतिहासिक स्थळे, लेणी, गड-किल्ले आणि स्थळांची छायाचित्रे सादर करता येतील. जागतिक पर्यटन दिनानिमित्त ही स्पर्धा आयोजित केली आहे. १२ बाय १८ इंच ३०० डी.पी.आय सोल्युशन असलेले छायाचित्र ई-मेल व व्हॉटस्‌अ‍ॅप क्रमांकावर दिनांक २५ सप्टेंबर २०२१ पर्यंत द्यावयाची आहेत.

छायाचित्रासोबत स्थळाची थोडक्यात माहिती, तसेच स्पर्धकांनी स्वतःचे नाव, पूर्ण पत्ता, ई-मेल अ‍ॅड्रेस आणि संपर्क क्रमांक द्यावयाचा आहे. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील रहिवासी असलेले स्पर्धक स्पर्धेत भाग घेऊ शकतात. यात व्यावसायिक फोटोग्राफरही भाग घेऊ शकतात व छायाचित्र मोबाईल आणि कॅमेरा या दोन माध्यमातून टिपलेली असावीत. छायाचित्रामध्ये कोणतीही छेडछाड करू नये. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क १०० रुपये एवढे आहे. पहिल्या तीन क्रमांकांना अनुक्रमे तीन हजार रुपये, दोन हजार रुपये, एक हजार रुपये आणि उत्तेजनार्थ पहिल्या दोन क्रमांकांना एक-एक हजार रुपये अशी रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत.

स्पर्धकांनी आपली छायाचित्रे प्रवेश शुल्कासह (गुगल-पे नं. ८८७९४३४१६६, ९२७००३५३५७) रायगड चणेरा येथील प्रसिद्ध छायाचित्रकार श्याम सरलेकर ९२२६९ २९२४३, गणेश भगत ८८७९४३४१६६, अतुल पाटील ९२७००३५३५७ या व्हॉटस्‌अ‍ॅप क्रमांकावर पाठवावीत. या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी भाग घ्यावा असे आवाहन संस्थेचे संचालक गणेश बा. भगत आणि अतुल पाटील यांनी केले आहे.

# एसटीचालकाची मनमानी; तरुणीने काढली खरडपट्टी

**खालापूर : प्रतिनिधी**

हात दाखवा एसटी थांबवा या राज्य परिवहन महामंडळाच्या घोषणेचा एसटीचालक आणि वाहकांना विसर पडला असून एसटीचालक त्यांच्या मनाप्रमाणे थांबा घेत आहेत. अशा चालकाची खालापुरातील तरुणीने चांगली खरडपट्टी काढल्याची घटना घडली आहे.

राज्य परिवहन महामंडळ तोट्यात असताना प्रवाशांसाठी अनेक योजनांची खैरात करण्यात आली. प्रवासी संख्या वाढवण्यासाठी हात दाखवा एसटी थांबवा अशी योजना देखील सुरू करण्यात आली, परंतु अधिकृत थांबा असतानादेखील एसटीचालक मनमानी करत ताटकळत बसलेल्या प्रवाशांकडे दुर्लक्ष करीत असल्याचा प्रकार खालापुरात घडला. खोपोली गावातून दुपारी ४च्या दरम्यान सुटणारी खोपोली पनवेल एसटीची वाट बघत तरुणी अल्टा कारखाना जवळ उभी होती. या ठिकाणी एसटीचा अधिकृत थांबा आहे. जवळपास एक तासाच्या प्रतीक्षेनंतर एसटी क्रमांक एमएच ०७ सी ७२११ आल्यावर हात करूनदेखील चालकाने दुर्लक्ष करत एसटी पुढे नेली.

या प्रकाराने संतापलेल्या तरुणीने थेट रिक्षा करत खोपोली फाटा येथील बसस्थानकात एसटी गाठली. एसटीचे वाहक मस्के यांना एसटी न थांबवण्याचा जाब विचारल्यावर त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली, परंतु मला तुमची तक्रार करायची आहे तुमचा वाहक क्रमांक द्या, असे बोलल्यावर त्यांनी सारवासारव केली. मी चालकाला विचारतो असे सांगत एसटी न थांबविण्याचे कारण त्यांनी चालकाला विचारले. यावर पाऊस असल्यामुळे एसटी थांबवली नाही, असे उत्तर देत चालकाने वेळ मारून नेली. प्रवाशांच्या सेवेसाठी असलेली एसटी अशाप्रकारच्या वाहक चालकांच्या अरेरावीमुळे तोटा सहन करत आहे. खालापूर प्रवासी संघटना याबाबत आक्रमक झाले असून, अशा चालक आणि वाहकांवर कारवाईसाठी मागणी करणार आहे.

# कोमसाप मुरूड-जंजिरा शाखेतर्फे शिक्षकांचा सन्मान

**मुरूड : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद मुरूड-जंजिरा शाखेतर्फे शिक्षक दिनानिमित्त शिक्षक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी कोकण मराठी साहित्य परिषदेचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या व प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर, कार्याध्यक्ष अरुण बागडे, माजी अध्यक्षा प्रतिभा जोशी, डॉ. रवींद्र नामजोशी आदी व्यसपीठावर उपस्थित होते.



(छाया : संजय करडे)

प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्त मुख्याध्यापिका नैनिता कर्णिक, उषा खोत, वैशाली कासार, सर एस. ए. हायस्कूल सेवानिवृत्त शिक्षक, तथा नगरपालिका मुरूड पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, कार्यरत कला शिक्षक व प्रसिद्ध रांगोळीकार महेंद्र पाटील, वसंतराव नाईक महाविद्यालय मुरूड येथील इंदिरा गांधी गोल्ड मेडल प्राप्त मधुकर वेदपाठक यांचा यथोचित गौरव करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाचे औचित्य साधून कराटेपटू प्रसाद चौलकर यांची आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. ऊर्मिला नामजोशी यांनी सूत्रसंचालन केले. सिद्धेश लखमदे यांनी आभार मानले आणि ज्येष्ठ शास्त्रीय गायक डॉ. रवींद्र नामजोशी यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान बाप्पाचे कामगार नेते सुरेश पाटील, रयत सेवक संघाचे नूरा शेख, मुख्याध्यापक घाग आर्दीनी दर्शन घेतले. सोबत महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, उपसरपंच विजय घरत आदी.



पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगेश पिळविळकर यांच्या गणरायाचे दर्शन घेतले. सोबत भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक अनिल भगत, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर आदी.



पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी माजी नगरसेवक जगदिश गायकर, तसेच विजय गायकर यांच्या घरच्या श्रीगणेशाचे दर्शन घेतले.





पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कुंडेवहाळचे सरपंच सदाशिव वास्कर आणि तळोजा भोईरपाडा येथील भाजप कार्यकर्ते अरुण भोईर यांच्या बाप्पाचे दर्शन घेतले.



उरण : कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या चिरले येथील निवासस्थानी स्थानापन्न बाप्पा.



उरण : कामगार नेते सुरेश पाटील यांच्या जासई येथील निवासस्थानी विराजमान गणराय.



दत्तूराम भोईर, उचेडे, पेण



महेश काळे, पनवेल



अशोक पवार, पनवेल



पाली : अंबिके कुटुंबीयांची मतदान अधिकाराचा संदेश देणारी आरास.



पनवेल : प्रसिद्ध लोकगीत गायक एकनाथ माळी यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, किशोर पाटील, जयवंत देशमुख आदी उपस्थित होते.



(छाया : नितीन शेडगे)

मुरुड : निशा म्हात्रे यांची गौराई.





सौजन्य : संजय पाटील, पनवेल तालुका भाजप उपाध्यक्ष











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com